# आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक मिळविण्याची कार्यपध्दती

| अ.क्र | प्रश्न | समाधान |
|---|---|---|
| १ | ही सुविधा कशी वापरायची ? | या बाबतची आज्ञावली महाराष्ट्र शासनाच्या http://beams.intranet.maharashtra.gov.in किंवा http://beams.maharashtra.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध आहे. सदर मागणीपत्र भरण्याची सुविधा वित्त विभागाच्या बीम्स (बीडीएस), सेवार्थ अशा विविध प्रणालीच्या प्रथम पृष्ठावर (होम पेज) "नवीन आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक मागणी", "Demand for New DDO Code" या जोडणीवर उपलब्ध आहे. नविन आहरण व संवितरण अधिकारी संकेतांकासाठी मागणीपत्र निर्मित करावयाची कार्यपध्दती पुढील प्रमाणे राहील.<br>१) शासनाच्या संगणक प्रणालीवर असणाऱ्या उपरोक्त जोडणीवर क्लीक करावे.<br>२) त्यानंतर आहरण व संवितरण अधिकाऱ्यास माहिती भरण्यासाठी New DDO Registration Form नमुना उपलब्ध होईल.<br>३) त्यामध्ये आवश्यक माहिती अचूक भरावी.<br>४) "सबमीट" या बटणावर क्लीक केल्यावर प्रणालीव्दारे व्यवहार क्रमांक नमूद केलेले मागणीपत्र तयार होईल.<br>५) सदरच्या मागणी/विनंती पत्राची संगणकीकृत प्रिंट काढून त्या सोबत संबंधीत शासन निर्णय व महालेखापाल, मुंबई/नागपूर किंवा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे प्राधिकार पत्रासोबत प्रस्ताव संचालनालय, लेखा व कोषागार, संगणक शाखा, पाचवा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२ येथे सादर करावा. |
| २ | हा फार्म कसा भरावा ? | प्रादेशिक विभाग, जिल्हा, कोषागार/उपकोषागार, मंत्रालयीन विभागाचे नांव या Drop down Box मध्ये Select करुन माहिती भरावयाची आहे. व आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे पदनाम, कार्यालयाचा पूर्ण पत्ता, शासन निर्णय क्रमांक व दिनांक, महालेखापाल, मुंबई/नागपूर अथवा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक व दिनांक, तसेच आपला दुरध्वनी क्रमांक हे सर्व रकाने भरण्यात यावेत. तसेच Word Vefification सुध्दा टाकण्यात यावे.<br>Users are requested to select Region, District, Treasury/Sub Treasury, Department by Drop down Box, and enter DDO Designation, Office name and address, Department GR Number, A.G. Authorisation Number, Contact details etc. Also do Word Verification then submit. |
| ३ | फार्म भरल्यानंतर कुठे पाठवावा ? | सदरच्या मागणी/विनंती पत्राची संगणकीकृत प्रिंट काढून त्या सोबत आहरण व संवितरण अधिकारी घोषित केल्याचे शासन निर्णय व महालेखापाल, मुंबई/नागपूर किंवा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे प्राधिकार पत्रासोबत प्रस्ताव संचालनालय, लेखा व कोषागार, संगणक शाखा, पाचवा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२ येथे पाठवावा. |
| ४ | आह. व संवि. अधि. संकेतांक मिळण्यासाठी संपर्क कुठे करावा ? | संचालनालय, लेखा व कोषागार, संगणक शाखा, पाचवा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२ येथे संपर्क करावा.<br>दुरध्वनी क्रमांक :-०२२-२२०२९१२८/२२०२२३८१/२२०२२१४५/२२०२२१५३/ २२०२३४९०, विस्तारीत क्रमांक २०६/२१०.<br>फॅक्स क्र. :- २२८४६७५२. |